P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad Address:- Office Of The Commissioner Of Police , Premlok Park Chinchwad, Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक – ०७/०४/२०२५**

## “पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, येथे शांतता कमिटीची बैठक पार पडली”

आगामी सण,उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आयुक्तालय स्तरावरील शांतता समीतीची आज रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष श्री.आण्णा बनसोडे, मा.आ.श्रीमती उमाताई खापरे, मा.आ.श्री अमित गोरखे, मा.आ.श्री शंकर जगताप, मा.आ.श्री बाबाजी काळे, यांचेसह श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, श्री प्रदिप जांभळे पाटील, अति.आयुक्त मनपा पिंपरी चिंचवड हे तसेच शांतता समितीचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

शांतता समितीचे सदस्यांनी सण उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीसांनी केलेली चांगले कामाचे कौतुक केले तसेच सुचना मांडल्या.

पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड श्री.विनय कुमार चौबे यांनी सर्व उपस्थितांचे सहकार्याबद्दल आभार मांडले.सदस्यांनी मांडलेल्या सुचना पोलीस ठाणे अधिकारी यांना योग्य सुचना देण्यात येतील असे सांगितले. तसेच आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस सज्ज असल्याचे सांगितले. धार्मिक व जातिय सलोखा अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे सोशल मिडीयाचा जबाबदारीने वापर करावा असे आवाहन केले.

श्री.संदीप डोईफोडे, पोलीस उपायुक्त गुन्हे/ विशेष शाखा यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर बापु बांगर, पोलीस उपायुक्त वाहतुक यांनी आभार प्रदर्शन केले.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**